# मुंबई विद्यापीठ

No.REG/ICC/२०२०-२०२१/२३

**परिपत्रक :-**

विषय : दिनांक ०३ जानेवारी २०२१ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा....

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य, / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, संचालक, उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, महाज्योती या संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.या उपक्रमाअंतर्गत महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे जिवनपट व समाजकार्याला उजाळा देण्यासाठी निबंधस्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. निबंध स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे आहेत:

१. सावित्रीबाई फुले आणि सार्वत्रिक शिक्षण
२. स्त्री पुरुष समानता आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार
३. पहिल्या भारतीय स्त्रीवादी विचारवंत : सावित्रीबाई फुले

स्पर्धा जिल्हास्तरावर दि. २१/१२/२०२० ते २७/१२/२०२० या कालावधीत घेण्यात येणार आहे. यातील स्पर्धक हे महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील महाविद्यालयाअंतर्गत पदवीपुर्व शिक्षण घेणारे विद्यार्थी सहभागी होवू शकतात. निबंध मराठी भाषेत असावा व त्याची शब्दसंख्या १००० पर्यंत असावी.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचा निबंध त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून प्रमाणित करुन किंवा त्यांच्या चालू वर्षाच्या ओळखपत्रासह www.mahajyoti.org.in या संकेत स्थळावर दि. २७ डिसेंबर २०२० पर्यंत अपलोड करावे.

या स्पर्धेची सविस्तर माहिती www.mahajyoti.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

स्थळ : मुंबई ४०० ०३२
दिनांक : २३ डिसेंबर, २०२०